प्रेस नोट दि. ०३/१०/२०१७

**''दरोडा प्रतिबंधक पथक, दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे शहर पथकाची कारवाई सराईत गुन्हेगारांकडून १,०४,५००/- रु. मुद्देमाल जप्त करुन घर फोडी व वाहन चोरीचे तीन गुन्हे उघडकीस.''**

दि. २९/०९/२०१७ रोजी स्वारगेट व दत्तवाडी पो स्टे चे हद्दीमध्ये दक्षिण प्रादेशिक विभाग दरोडा प्रतिबंधक पथकाचे अधिकारी व कर्मचारी हे गुन्हे प्रतिबंधक पॅट्रोलिंग करीत असताना इसम नामे १) दिगंबर गजेंद्र मांदळे, वय-२४ वर्षे, रा. पाण्याचे टाकीजवळ, सहयोग नगर, वारजे, पुणे व २) नितीन लक्ष्मण तांबारे, वय-२७ वर्षे, रा. लक्ष्मीनगर झोपडपट्टी, डहाणुकर कॉलनी, कोथरुड, पुणे हे संशयीतपणे फिरताना मिळून आल्याने त्यांना चौकशीकरीता ताब्यात घेऊन त्यांचेकडे सखोल तपास केला असता आरोपी **नामे दिगंबर गजेंद्र मांदळे याने दत्तवाडी पो.स्टे.चे हद्दित घरफोडी चोरी व आरोपी नामे नितीन लक्ष्मण तांबारे याने फरासखाना पो.स्टे.चे हद्दितुन दुचाकी वाहन चोरून स्वारगेट पो.स्टे.चे हद्दित घरफोडी चोरी** केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करून त्यांचे ताब्यातुन **एक दुचाकी वाहन व सोन्या चांदिचे दागीने असा १,०४,५००/- रु.**चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दोन्ही आरोपी हे रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार आहेत.

वरील कारवाई ही श्री.रविंद्र सेनगावकर,अपोआ दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे,श्री.बसवराज तेली,पोउआ परिमंडळ १ पुणे, श्री.निलेश मोरे,सपोआ लष्कर विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पो.निरीक्षक प्रकाश मोरे,पोउनि चंद्रकांत लोहकरे,पोहवा बापू खुटवड,दिनेश शिंदे,कृष्णा बढे, रविंद्र फुलपगारे, पो.ना.प्रमोद मोहिते,योगेश घाटगे,अय्याज दड्डिकर,पो.शि.सचिन ढोक,मयुर शिंदे महावीर वलटे, अवधूत जमदाडे, नितीन जगदाळे,अविनाश कोंडे,निलेश जाधव, वैभव शितकल, विजय जगताप,संजय बनसोडे,नितेश जाधव सर्व नेमणुक दरोडा प्रतिबंधक पथक दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे शहर यांनी पार पाडली आहे.